**जगभर**

# सीरियन हत्याकांड

## चंद्रशेखर पुरंदरे

गेल्या वर्षीच्या जानेवारीपासून अरब जगतात विविध राजवटींविरुद्ध असंतोषाचे आवाज उमटू लागले. 'निर्वाचित लोकशाही आणा, प्रस्थापित घराणेशाही-लष्करशाही-हुकूमशाही उलथा' या प्रमुख मागणीसाठी सामान्य माणूस बहुसंख्येने रस्त्यावर आला. ट्युनिशिया, लिबिया, सीरिया, येमेन, इजिप्त, बहारिन या सगळ्याच देशात हे वारे फोफावले. (त्याचा आढावा गतवर्षीच्या 'आंदोलन'च्या अंकामध्ये घेतला आहे.)

अपेक्षेनसुसार हुकूमशहांनी लष्कराच्या जोरावर हे उठाव दडपण्यास सुरूवात केली. निदान ट्युनिशिया आणि इजिप्तचे हुकूमशहा फारसा रक्तपात न होता पदच्युत झाले. पण बहारिनच्या सुन्नी घराणेशाहीने बहुसंख्य शियांचा विरोध सौदी अरेबियाचे सैन्य आयात करून दडपून टाकला. त्यात कैद्यांवर अनन्वित अत्याचार, माणसे 'गायब' होणे व रस्त्यावर आंदोलकांना सरळ गोळ्या घालणे हे सर्व प्रकार झाले. अमेरिकेचा नौदल तळ बहारिनमध्ये असल्याने बहारिनची राजवट शाबूत राखणे अमेरिकेला आवश्यक आहे. या दडपशाहीला अमेरिकेची मंजुरी होती. लिबिया, येमेनचे हुकूमशहा सहजी गेले नाहीत. नेटोच्या सशस्त्र कारवाईने लिबियन विरोधकांना मदत केल्याने गडाफी मारला गेला तर येमेनचा अध्यक्ष आता कोठे उपाध्यक्षावर सत्ता सोपवून अमेरिकेला पळ काढण्याच्या वेधात आहे.

सीरियन असंतोष गेले अकरा महिने धुमसत आहे. आता परिस्थिती यादवीपर्यंत आली आहे. तुर्कस्तान, इराक, जॉर्डन, लेबॅनन आणि इस्रायल हे देश सीरियला लागून आहेत. सीरियन अस्थिरतेचा परिणाम या प्रत्येक देशावर निराळ्या प्रकारे होत असल्याने तो सगळाच प्रदेश अधिकाधिक अस्थिर होत आहे. या प्रश्नाचे पदर पुढे पाहू पण लक्षात येणाऱ्या दोन-तीन महत्त्वाच्या गोष्टी अशा - एकतर सामान्यांच्या कत्तलीची (एव्हाना ५ ते ८ हजार निरपराध सीरियन राजवटीने मारले आहेत) कोणत्याच संबंधित गटाला पर्वा नाही. राजवटीला तर नाहीच पण राजवटीच्या बाहेरच्या समर्थकांना - चीन, रशिया, इराण यांनाही नाही. राजवटीच्या अंतर्गत विरोधकांना - सुन्नीपंथीय मुसलमान - नाही आणि राजवटीच्या बाहेरच्या विरोधकांना - अमेरिका, इतर अरब जगत, तुर्कस्तान - यांनाही नाही. यातील काहींचे हितसंबंध सीरिया अस्थिर राखण्यात आहेत. स्वत:चा आदर्शवाद पुढे ढकलण्यासाठी सीरिया त्यांच्या दृष्टीने 'स्थिर' करण्यात इतरांचे हितसंबंध आहेत. संभाव्य अर्थार्जन, सत्तेचा विस्तार आणि धार्मिक श्रद्धा हे सगळे घटक या प्रश्नाशी संलग्न आहेत.

प्रथम धार्मिक-भूराजकीय अक्ष पाहू. शियापंथीय मुस्लिमांच्यात अलेवाईत म्हणून एक उपपंथ आहे. सीरियामध्ये हाफेझ अल् असाद या लष्करशहाची राजवट १९७० पासून २००० पर्यंत अबाधित चालू राहिली. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा बशर असाद सत्तेवर आला. असाद अलेवाईत. सीरियात बहुसंख्य जनता सुन्नी अरब आहे. शिया कमी, त्यातही अलेवाईत अल्पसंख्याक, सरकारी नोकऱ्या, उद्योगधंदे यात दोन्ही असादने अलेवाईत पंथीयांचा भरणा केलेला आहे. राजवटीविरुद्धच्या असंतोषाचे हे प्रमुख कारण आहे. सीरिया इतर अरब राष्ट्रांच्या मानाने गरीब राष्ट्र आहे. त्यात वाढती लोकसंख्या व वाढती बेरोजगारी या आधीच्या परिस्थितीत आता आंतरराष्ट्रीय व्यापारावर बंदी, पर्यटनव्यवसाय ठप्प होणे या कारणांनी अनिष्ट भर पडली आहे. अशा आर्थिक हलाखीच्या वातावरणात जुने वांशिक-धार्मिक वैर अधिकच उफाळून येते. सीरियातील शियापंथीय राजवट कायम रहावी हे इराणचे धोरण आहे. इराण हा मध्यपूर्वेतील एकच देश बहुसंख्य शिया आहे. इराणी पर्शियन वंशाचे आहेत. ते एरवी अरबांना तुच्छ मानतील. इराणची मोठी आर्थिक मदत सीरियाला आजवर चालू आहे. त्याबरोबर लेबॅनन, पॅलेस्टाईनमधील अनुक्रमे हेझबोला, हमास या गटांना पैसा, शस्त्रे व इतर मदतीचे धोरण इराण व सीरियाने ठेवले आहे. त्यामुळे ही गडबड सुरू होताच इराणने असंतुष्ट जनतेला काबूत ठेवण्याचे तंत्रज्ञान असणारे त्यांचे खास दल क्रौर्याचे प्रशिक्षण देण्यासाठी सीरिया रवाना केले.

सीरियाची स्वत:ची लेबॅननमध्ये कित्येक वर्षे ढवळाढवळ चालू होती. त्यांचे सैन्यही तेथे होते. पण तिथल्या जनक्षोभामुळे चार-पाच वर्षांपूर्वी त्यांना सैन्य काढून घ्यावे लागले. शेजारचा जॉर्डन देश अमेरिकेच्या अखत्यारीत आहे. उत्तरेचा शेजारी तुर्कस्तान अलिकडेपर्यंत सीरियाचा मित्रराष्ट्र होता पण सरकारी अत्याचाराने सीरियन नागरिकांचे लोंढे तुर्कस्तानला निर्वासित म्हणून रवाना होऊ लागले. हा भार झेपणे कठीण झाल्यावर तुर्कस्तान सीरियावर स्वत:च्या जनतेवर अत्याचार करतो म्हणून टीका करू लागला व संबंध ताणले गेले आहेत. वस्तुत: खुद्द तुर्कस्तानमध्ये कुर्द अल्पसंख्यांकांना समान अधिकार नाहीत, सापत्नभावाची वागणूक दिली जाते, मुख्य प्रवाहातील तुर्क त्यांना वाळीत टाकतात (ही

तुर्क जातीव्यवस्था) आणि देशद्रोहाच्या नावाखाली सरकार त्यांच्या कत्तलीही करते. म्हणजे, तुर्कस्तानने सीरियाला शिकवावे यात तात्त्विक भूमिकेपेक्षा व्यावहारिक सोयीचा भाग आहे.

हा मुस्लिम धर्माच्या दृष्टीने आढावा झाला. राजकीयदृष्ट्या इतर शक्तींपैकी इस्रायल-सीरिया शत्रूच आहेत. पण असाद जाऊन नवीन मूलतत्त्ववादी मुस्लिम राजवट येणे इस्रायला जास्त धोक्याचे आहे. रशिया थोरल्या असादपासून सीरियाला शस्त्रास्त्रपुरवठा व इतर पाठिंबा देत आलेला आहे. रशियाच्या नौदलाचा एक तळही सीरियात आहे त्यामुळे अमेरिकेला जशी बहारिनची राजवट राखण्यात रस आहे, तसाच रशियाला सीरियाची. त्यातही एकाधिकारशाहीला लोकांनी आव्हान देणे रशियाच्या पुतीनला धोक्याचे वाटते. अरब जगातील असंतोष हा पश्चिमेच्या तेथील ढवळाढवळीचा पुरावा आहे. असा असंतोष रशियात आपण येऊ देणार नाही असे वक्तव्य फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात पुतीनने केले. याच आठवड्यात युनोच्या सुरक्षा समितीपुढे अरब राष्ट्रांनी सुचवलेला तोडगा संमतीसाठी आला होता. त्यानुसार येमेनचा राष्ट्राध्यक्ष जसा उपाध्यक्षाकडे सत्ता सोपवून निवृत्त होणार आहे, तसेच असादने उपाध्यक्षाकडे सत्ता सोपवून निवृत्त व्हावे अशी योजना होती. युरोप, अमेरिकेचा त्या मसुद्याला पाठिंबा होता. पण चीन-रशियाने व्हेटो वापरून तो तोडगा नामंजूर केला. चीनची भूमिका सावध असते. एका बाजूला हा पश्चिमेचा सीरियाच्या अंतर्गत बाबीत हस्तक्षेप आहे असे चीनचे अधिकृत म्हणणे आहे. दुसऱ्या बाजूला, याच सुमारास बिजिंगमध्ये असादविरोधी गटाच्या एका नेत्याशी चीनने वाटाघाटी चालू केल्या. लिबियाचा गडाफी मारला जाईपर्यंत चीनने अशीच भूमिका घेतली होती पण त्याचवेळी विरोधकांशी संवाद चालू ठेवला होता. त्यामुळे गडाफीची राजवट उलथली तरी चीनचे व्यापारी संबंध कायम राहिले. उर्वरित अरब राष्ट्रांनी सीरियातील शासकीय हिंसाचार प्रत्यक्ष पाहण्यासाठी व त्यावर आळा घालण्यासाठी एक निरीक्षक पथक पाठवले होते. पण या पथकाची सुरक्षा नीट पाहिली गेली नाही. प्रत्यक्ष हिंसाचाराच्या ठिकाणी त्यांना जाऊ देण्यावरही निर्बंध घालण्यात आले, किंवा वाहने उपलब्ध न करणे वगैरे प्रकार घडले. त्यामुळे हे पथक अयशस्वी झाले. मुळात हुकूमशाही आणि असादइतकेच रक्तरंजित हात असताना इतर अरब राष्ट्रांनी नैतिक अहंकार दाखवणेच विपर्यस्त होते.

असादचा दावा कायम असा आहे की त्याचे सैन्य आतंकवाद्यांशी लढत आहे आणि जे काही बळी जात आहेत, ते त्याचे सैनिक आहेत. इराण, चीन, रशिया सोडता इतरांचे मत असे की असाद सत्ता टिकवण्यासाठी आपल्याच लोकांना ठार मारत आहे. त्यात थोरल्या असादपासून इतर अरब राष्ट्रांशी सीरिया फटकून वागत आला आहे. तेलाची संपत्ती इतर अरबांच्या तुलनेने कमी असल्याने तेही सीरियाला हीन मानतात. अशा परिस्थितीत नक्की खरे कोण बोलत आहे याचा अंदाज कठीण असतो. तरीही एका त्यातल्या त्यात विश्वासार्ह सूत्राने प्रसिद्ध केलेल्या एका सैनिकाच्या मुलाखतीनुसार हे हत्याकांड अमानवी पातळीवर चालू आहे. केवळ सरकार उलथा ही मागणी रस्त्यावर येऊन केल्याबद्दल इजिप्तच्या लष्कराने आपल्याच लोकांवर गोळीबार तरी केला नव्हता. ही भयानकता असह्य होऊन सीरियात सैनिक लष्कर सोडून जात आहेत. अशा फुटीरांनी तुर्कस्तानमध्ये एक तळच ठोकला आहे. त्यात सीरियन लष्कर सोडलेल्या उच्च पदाधिकाऱ्यांपासून पायदळाच्या शिपायापर्यंत सैनिकांचा समावेश आहे. सशस्त्र मार्गाने समांतर सरकार स्थापन करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अशाच एका सैनिकाची मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. तो जर्मनीत वाढलेला सीरिअन अरब आहे. तेथून स्थायिक होण्यासाठी तो दोन-तीन वर्षांपूर्वी सीरियाला परतला. हा गोंधळ सुरू झाल्यावर कित्येक तरुणांची झाली तशीच त्याचीही सक्तीने लष्करात भरती करण्यात आली. लष्करात भरती झाल्यावर रेडिओ, टीव्ही, इंटरनेट हे 'बाहेरचे' मार्ग बंद करण्यात येतात. सैनिक ज्या प्रदेशातला नसेल, अशा अशांत प्रदेशात त्याची रवानगी होते. तीही अल्पावधीसाठी, जेणेकरून स्थानिकांशी संबंध दृढ होणार नाहीत. अनेक शहरात जमाव, मोर्चे सतत चालू असतात. त्यातल्या एका ठिकाणी या सैनिकाच्या तुकडीची रवानगी झाली. एका इमारतीच्या बाल्कनीत उभे राहून खालच्या जमावावर गोळीबार करायचा असे स्पष्ट आदेश होते. या सैनिकाच्या शेजारच्या सैनिकाला जमावातील एकजण ओळखीचा वाटला म्हणून तो इमारत सोडून जमावात गेला. तेवढ्या अल्पावधीत गोळी लागून तो तरुण मृत्युमुखी पडला होता. तो त्या सैनिकाचा धाकटा भाऊ होता. वय वर्षे १८. अगदी दोन वर्षांच्या मुलांपासून बळी गेल्याच्या कहाण्या आता बाहेर येत आहेत. त्यामुळे लष्कर सोडणाऱ्यांची संख्या वाढत आहे. पकडले गेल्यास शारीरिक अत्याचार व देहदंड निश्चित असतो. मग छुपेपणे हे सैनिक उत्तर सीमा ओलांडून तुर्कस्तानला येतात. तुर्कस्तान अशांच्यासाठी आता दुसरी छावणी उभारत आहे.

राजवट दुबळी करण्यासाठी मागच्या वर्षापासून युरोप अमेरिकेने सीरियाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर कडक निर्बंध घातले. अशा धोरणामागे पश्चिमेचा नेहमीचा होरा असा असतो की सामान्यांचे हाल वाढले की असंतोष वाढेल व राजवट कोसळेल. वस्तुत: तसे होताना दिसत नाही. इराण, उत्तर कोरिया, इराक यांच्यावर असे निर्बंध घातल्याचा परिणाम त्या-त्या राजवटी अधिकच दमनकारी होण्यात झाला आहे. दुसरीकडे अशा निर्बंधांचे चटके सामान्यांनाच जास्त बसतात. आता सीरियामध्ये (व इराकमध्ये) पाणी, वीज यांची टंचाई आहे. जीवनावश्यक वस्तू अधिकाधिक महाग होत

आहेत. आपल्याकडे जशा मायावती उत्तरप्रदेशाच्या अविकासाबद्दल केंद्राने पैसे दिले नाहीत असे कारण सांगतात तसाच प्रचार राजवट पश्चिमेविरुद्ध करू लागते. मग जनमताचा रोख राजवटीकडून काही प्रमाणात बाहेरच्या शक्तींकडे वळतो. त्यात असाद ही दडपशाही टोकापर्यंत नेईल असे दिसते. हल्ल्यांची तीव्रता वाढत आहे. संपूर्ण गावे पेटून त्यांचा अन्न, पाणीपुरवठा थांबवणे, बेगुमान कत्तली करणे चालू आहे. कितीही लोक विरुद्ध असले तरी राजवटीची शस्त्रास्त्रक्षमता विरोधकांच्या हत्यारांपेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. अजून असादने वायुसेनेचा मुक्त वापर सुरू केलेला नाही. तोही होऊ शकतो. विरोध लवकर चिरडण्याचे आणखी एक कारण म्हणजे व्यापार, पर्यटनव्यवसाय ठप्प झाल्याने सरकारी तिजोरी वेगाने आटत आहे. अण्वस्त्रनिर्मितीच्या संशयावरून मित्रराष्ट्र इराणवरही व्यापारबंदी आहे. त्यामुळे इराणची अर्थव्यवस्थाही खालावत आहे. त्यात तेथे त्यांची स्वत:ची अंतर्गत अशांतता आहेच. त्यामुळे असादच्या या मोहिमेला इराण दीर्घकालपर्यंत पैसे-शस्त्रे पुरवू शकेल असे वाटत नाही. रशिया शस्त्रे पुरवू शकेल कारण असादच्या पाडावानंतर संभाव्य इस्लामी मूलतत्त्ववादाची भीती रशियालाही आहेच. त्यांची स्वत:ची मुस्लिम राज्ये व शेजारची पूर्वीच्या सोविएत युनियनमधली मुस्लिम राष्ट्रे येथे या मूलतत्त्ववादाचे उद्रेक होतच असतात. असाद मेलाच तर हीच शस्त्रे इस्लामी मूलतत्त्ववाद्यांच्या हाती पडतील ही इस्रायल-अरब जगत-पश्चिमेची भीती आहे.

हाफेझ-अल्-असादने त्याच्याविरुद्धचे बंड १९८२ च्या फेब्रुवारीत चिरडले होते. त्यात या एका शहरात तीन आठवड्यात २० ते ४० हजार नागरिक ठार मारण्यात आले होते. संपूर्ण शहर उद्ध्वस्त झाले होते. वीस वर्षांनंतर बशर असाद त्याच मार्गाने जात आहे. ते बंडही असादच्या अलवाईत राजवटीविरुद्ध सुन्नी बहुसंख्याकांनी केले होते. आजही तेच दोन प्रतिपक्ष आहेत.

तात्पर्य, इतर मध्यपूर्वेत लोकशाहीचा नारा तरी विरोधकांनी लावला होता. पण सीरियात लोकशाहीपेक्षा वंशद्वेष हे असंतोषाचे प्रमुख कारण दिसते. आर्थिक अवनतीही महत्त्वाचे कारण दिसत नाही. ही परिस्थिती इतर अरब देशातही शिया-सुन्नी संघर्षात दिसते. संघर्ष लोकशाहीसाठी चालला आहे असे म्हटले की विरोधकांना एक दैवी वलय प्राप्त होते. पश्चिमेचा त्यामुळे आग्रह तो आहे. सौदी अरेबियाची घराणेशाही अमेरिकन पाठिंब्यावर उभी आहे. तेथे लोकशाही असल्याने लोकशाहीचा गजर सीरियात सोईचा आहे.

*E-mail - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*